महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ 1 मे 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 302 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# टिटवाळा येथे डॉ. प्रतिक्षा घोडविंदे यांच्या
# रामायु पंचकर्म हॉस्पिटल व वेलनेस सेंटरचे उद्घाटन




## मठाधिपती आलोकनाथ महाराजांसह मान्यवरांची उपस्थिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष तथा कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रविंद्र घोंडविदे यांच्या कन्या डॉ प्रतिक्षा रविंद्र घोंडविदे यांच्या रामायु पंचकर्म हाँस्पिटल व वेलनेस सेंटर चे उद्घाटन आज म्हणजे साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक सुंदर मुहूर्तावर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

ठाणे जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवणारे, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा सभापती, संचालक तसेच पत्रकार, मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य, आणि जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष रविंद्र घोंडविदे यांच्या कन्या डॉ प्रतिक्षा रविंद्र घोंडविदे यांनी वैद्यकीय अभ्यासातील बी ए एम एस, एम डी आयुर्वेद,अशा उच्च पदव्या प्राप्त करून टिटवाळा



येथील प्रसिद्ध महानगपती मंदिरासमोर रामायु पंचकर्म हाँस्पिटल व वेलनेस सेंटर, नावाचे सर्व सोईनियुक्त हाँस्पिटल सुरू केले, यामध्ये पंचकर्म चिकित्सा, आयुर्वेदिक औषधोपचार, जीवनशैली, डिटाँक्स थेरपी, स्त्रीरोग व प्रसूती उपचार, त्वचारोग व संधिवात उपचार, डायबेटीस व स्थूलता नियंत्रण, मानसिक आरोग्य सुधारणा, आदी सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, शिवाय नैसर्गिक व शुद्ध औषधोपचार, स्वच्छ व शांत उपचार कक्ष, रोगमुक्ती व आरोग्य, संवर्धनासाठी विशेष कार्यक्रम, अशी विविध वैशिष्ट्ये या उपचार पध्दतीची असल्याचे डॉ प्रतिक्षा घोंडविदे यांनी सांगितले.

या सोहळयाला कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम, तालुक्यातील विविविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गावचे सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार संजय कांबळे, विलास भोईर, राजू टपाल, तसेच जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य वाघ सर, उप प्राचार्य सोष्टे सर, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आदी उपस्थित होते.




## मुरबाड उपनगराध्यक्षपदी अपक्ष उमेदवार दिक्षिता वारघडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड, ता. ३० (बातमीदार) मुरबाड नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी अपक्ष म्हणून निवडून आलेल्या भाजपच्या बंडखोर उमेदवार दीक्षिता वारघडे विजयी झाल्या आहेत. त्यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार शिवसेनेच्या नम्रता नितीन तेलवणे यांचा एका मताने पराभव केला. वारघडे यांना नऊ तर तेलवणे यांना आठ मते मिळाली. सोमवारी (ता. २८) ही निवडणूक पार पडली. मुरबाड नगरपंचायतीची सत्ता भाजपकडे आहे. भाजपचे १०, शिवसेनेचे पाच व अपक्ष दोन असे पक्षीय बलाबल आहे. दोन्ही अपक्ष उमेदवारांचा आमदार किसन कथोरे यांना पाठिंबा आहे. विधानसभा निवडणुकीत शिवसेना नगरसेवक नितीन तेलवणे व त्यांच्या पत्नी नम्रता तेलवणे या दोघांनी भाजप उमेदवार किसन कथोरे यांना मदत केली होती, त्याची परतफेड म्हणून नम्रता तेलवणे यांना उपनगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यात आली होती. शिवाय त्यांच्या विरोधात भाजपने उमेदवार उभा केला नव्हता. कागदोपत्री भाजपचे दहा व शिवसेनेचे पाच अशी एकूण १५ मते शिवसेनेच्या नम्रता तेलवणे यांना पडणे अपेक्षित होते, व त्यांचा विजय निश्चित होता. मात्र पडद्याआडून चक्रे फिरविल्याने दीक्षिता वारघडे यांनी उपनगराध्यक्ष पदासाठी अर्ज भरला. यावेळी अटीतटीच्या निवडणुकीत त्यांनी विजय मिळवला.

## मुरबाड तालुका खरेदी -विक्री संघाच्या भ्रष्टाचारा विरोधात माहिती अधिकार महासंघाचा उपोषणाचा एल्गार!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड तालुका खरेदी -विक्री संघाच्या कथित भ्रष्टाचारा विरोधात माहिती अधिकार महासंघाचा 7 मे पासून पुन्हा उपोषणाचा एल्गार! मुरबाड-प्रतिनीधी(दिलीप पवार)मुरबाड तालुका शेतकरी संघ लि. यांनी सन- २०१५/०१६ ते २०२३/०२४ या आर्थिक वर्षात केलेल्या भ्रष्टाचारा संबंधित दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल व्हावेत यासाठी माहिती अधिकार महासंघाचे उपाध्यक्ष शंकर वडवले व अन्य कार्यकर्ते येत्या 7 मे पासून मुरबाड तहसीलदार कार्यालया समोर पुन्हा उपोषणास बसणार आहेत. मुरबाड तालुक्यातील शेतकरी संघ लि. यांनी सन- २०१५/०१६ ते २०२३/०२४ या आर्थिक वर्षात भात खरेदीमध्ये तसेच ईतर आर्थिक व्यवहारामध्ये पुढीलप्रमाणे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे.

तत्कालीन व्यवस्थापक आणि चेअरमन यांनी संगनमताने केलेला भ्रष्टाचार पुढीलप्रमाणे

१) बारदानाच्या वजनापेक्षा शेतकऱ्यांचा जास्त भात घेणे.

२) शेतकऱ्यांकडून सुतलीचे व हमालीचे पैसे घेणे.

३) सात बारा मध्ये फेरफार करून भात खरेदी करणे.

४) संघाचे गाळे कागदावर ९९ वर्षाच्या करारावर ८० ते १०० रू. भाड्याने दिल्याचे दाखवून प्रत्यक्षात हजारो रुपयांची वसुली केली जाते.

५) दोन गाळयांची तर नोंदच केली नाही.

६) संघाच्या बचत खात्यातुन तात्कालीन व्यवस्थापक व चेअरमन यांनी स्वतःच्या नावाने पैसे काढून त्या पैशाच्या खर्चाची नोंद कॅशबुक मध्ये नसल्याने ती रक्कम त्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी वापरून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे.

७) संघाच्या नावाने चालवत असलेल्या रेशनिंग दुकानांमध्येही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला जातो.

तरी या सर्व गंभीर प्रकरणाची चौकशी करून तात्काळ संबंधित दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत या मागणीसाठी बुधवार दिनांक - ०७/०५/२०२५ पासून आमरण उपोषणाला बसणार आहे. जोपर्यंत संबंधित दोषींवर गुन्हे दाखल केले जात नाहीत तोपर्यंत उपोषण सुरूच राहील असा ईशारा शंकर वडवले व त्यांच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे .

## वेव्हजब परिषदेच्या उद्घाटनासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबईत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 30 :** भारताच्या पहिल्या जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन (वेव्हज्) शिखर परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 1 मे रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होणार आहे. या वेव्हज् परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असणार आहे."कनेक्टिंग क्रिएटर्स, कनेक्टिंग कंट्रिज" या घोषवाक्याखाली होणाऱ्या या चार दिवसीय शिखर परिषदेत भारताला मीडिया, मनोरंजन आणि डिजिटल नवप्रवर्तनाचे जागतिक केंद्र म्हणून प्रदर्शित करण्यात येईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि प्रतिभेच्या एकत्रीकरणाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असलेल्या या वेव्हज् 2025 मध्ये चित्रपट, ओटीटी, गेमिंग, कॉमिक्स, डिजिटल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, एव्हीजीसी-एक्सआर ब्रॉडकास्टिंग आणि नव्या तंत्रज्ञानाचा समावेश असेल. भारताच्या मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रातील सामर्थ्याचे हे सर्वांगीण प्रदर्शन असेल.

## ओहळ स्वच्छतेसाठी पडघा ग्रामस्थांचे साकडे

**पडघा (बातमीदार)** भिवंडी तालुक्यातील पडघा येथील पाण्याचे मुख्य स्त्रोत असलेला ओहोळ स्वच्छ करण्याची मागणी, एका माजी सरपंचाने लेखी निवेदनाद्वारे ग्रामपंचायतीकडे केली आहे. ओहळावर पावसाळ्यात गणेशोत्सवदरम्यान गणपती विसर्जन व इतर धार्मिक विधी होत असतात. तसेच या ठिकाणी स्मशानभूमी असल्याने पडघे गावासाठी त्याचे वेगळे महत्व आहे. तसेच गणेश घाट व स्मशानभूमी सुशोभीकरणाच्या नावाखाली लाखो रुपये खर्च करून कामे करण्यात आली आहेत. परंतु प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे पाण्याचे मुख्य स्त्रोत असलेल्या ओहळमध्ये रहिवाशी इमारतीचे घाण पाणी सोडले जात आहे. शिवाय परिसरातील नागरिक कचरा, प्लॅस्टिक टाकत असल्याने ओहळाला गटारीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. तसेच सोडलेले घाण पाणी एकाच ठिकाणी साचून राहिल्याने दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची भीती व्यक्त होत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गणपती विसर्जन होत असल्याने ग्रामपंचायतीने खर्च करून गणेश घाटसुद्धा बांधला आहे. त्यामुळे ओहळातील गाळ काढून आजूबाजूचा परिसर स्वच्छ करावा व गटारीचे पाणी ओहळात सोडले जात असेल ग्रामपंचायत कमीटी व प्रशासनाने त्याचे वेगळे नियोजन पावसाळ्यापूर्वी करावे, अशी मागणी पडघा येथील ग्रामस्थ व ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शंशाक तांबोळी यांनी लेखी निवेदनाद्वारे ग्रामपंचायत पडघा यांच्याकडे केली. दरम्यान आमदार शांताराम मोरे, सरपंच रवींद्र विशे, ग्रामपंचायत सदस्य यांनी ओहळाची पाहणी करून ही समस्या लवकर सोडवणार असल्याचे आश्वासन दिले.

# मुरबाड मधील उबाठा सेनेचे शिवसैनिक पदाधिकारी शिंदे गटात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे प्रमुख असलेले उद्धव ठाकरे सोबत बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिकांची एकापिढीने पन्नाशी पार केली आहे, मुरबाड शिवभक्त साबीरभाई शेख व धर्मवीर आनंद दिघेचे बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिक व शिवसेनेसाठी नेतृत्व करणारे असले तरी ते अर्थिक कुंचबनेला सामोर जात असल्याचे पाहता तरूणाईला आपल्या कडे वळविणे शक्य दिसत नाही , ज्या कडे संघटनेची जबाबदारी सोपविण्यात येते त्या कडे कोणतेच नियोजन नसल्याने व ज्याला शिवसैना काय हे कधीच कळले नाही व कळणार नाही अशाच्या हातात नेतृत्व दिल्याने वर्ष भरातच तालुक्यातील शिवसेना पक्षाला फुटीचं ग्रहण लागले, वर्षभरा पुर्वी नेमलेले असे सुभेदार ईथेच थांबले नाहीत तर शिवसेना ही आमचीच आहे असे वर्तन पाहता तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचे साधे फोन घेतले जात नाहीत की कधी त्यांना विश्वासात घेतले जात नाही,अशाना एकप्रकारे पक्षच त्याब्यात घेतला की काय? अशी वागणूक निष्ठावंताना



दिली जात असल्याल्या मुळे घायाळ झालेले निष्ठावंतांना गप्प राहणे किंवा शिवसेनाविचारांचा वसा जोपासणा-या शिंदे गटाचा मार्ग निवडल्या शिवाय पर्याय राहिला नाही. उबाठात नेमलेल्या पाहुण्याला थेट ओटिवर बसविले असले किंवा सोबत असलेल्या कातडी बचाव सुभेदारांच्या ताकतीवर किंवा जोरावर येथील ढासळत असलेला बुरज रोखता येणार का! असा प्रश्न शिवसैनिकांसमोर निर्माण झालेला असतानाच दि २८ रोजी रात्री तालुक्यातील तालुकाप्रमुख संतोष जाधव सह तमाम पदाधिकारी जिल्हा पदाधिकारी महिला, उपजिल्हा संघटक सौ उर्मिला लाटे, तालुकाध्यक्ष, सह अनेक महिलावर्गाने नेते प्रकाश पाटलांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या मुक्तागीर या शासकिय निवासस्थानी शिंदेंच्या शिवसैनेत प्रवेश घेतला असल्याचे किंबहुना अशाच पद्धतीने शिवसेनेचा करभार सुरु राहिला तर, येथील शिवसेनेचं काही खरं नाही, त्यामुळेच येथील ढासळणाऱ्या बुरुजाला सावरणे तसे कठीण आहे.

### लोकाभिमुख नेते प्रकाश पाटलांच्या नेतृत्वाला धवधवीत यश

### उबाठा शिवसेनेतील जिल्हा महिला पदाधिकारी सौ उर्मिला लाटे तालुका प्रमुख संतोष जाधव सह पदाधिकारी सोबत २०० शिवसैनिकांचा उबाठा गटाला जय महाराष्ट्र !


ठाणे करांसह शिवसेनारूपी वटवृक्षाच्या फांदया कापल्या गेल्याच्या त्या पाठोपाठ सर्वसामान्य माणसा पासून ते शिवसैनिकांपर्यत ज्याची नाळ जोडली गेली असलेल्या ठाणेचा अभेद बालेकिल्ला एकनाथ शिंदे यांनी ठाण्यासह ग्रामिण भागातील शिवसेना ताब्यात घेतली हे त्याचेच धोतक आहे. शिवसेना ताब्यात घेतल्यावर एकनाथ शिंदे भारावून गेल्याचे दिसत नाहीत. किंबहुना स्वतःला पक्ष प्रमुख म्हणूनही घेतले जात नाही. जमिनीवर पाय ठेऊनच पक्षाचा कारभार ते हाकताना दिसत आहेत. म्हणूनच सर्वांना सोबत घेऊन शिंदे चालत आहेत,सोबत शिवसेना जिल्हाप्रमुख ते उपनेते पदाची धुरा साभाळीत अनेक वेळा खासदार की सारख्या पदावर पाणी सोडवे लागलेले जनदूत प्रकाश पाटिलां सारखे सहकारी त्यांना लाभले आहेत, ज्यावर शिवसेनेकडून वारवार अन्याय झाला असल्याने ते निष्ठावंत म्हणून शिंदे सोबत आहेत, गेल्या सहा महिण्या पासून या दोन तालुक्यातील शेकडो शिवसैनिकांना उबाठा ला जयमहाराष्ठ करून शिंदेच्या शिवसेनेत प्रवेशाची जणू मालिकाच सुरू आहे रोजच पाटलांच्या हस्ते उबाठा गटाचे शिवसैनिक असोत की पदीधीकारी शिंदे गटात प्रवेश घेतानाचे दिसून येते शिवसैनिरांनी आजपर्यत शिंदे गटाचा आसरा घेतला असून अनेक पदाधिकारी शिवसैनिक शिंदे गटात सामिळ झाल्याने मुरबाड तालुक्यातील उबाठाचा सातबारा मात्र कोरा करून ठेवला आहे!




## राज्यांतर्गत धावणाऱ्या विशेष रेल्वेगाडयांना जूनपर्यंत मुदतवाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
वृत्तसेवा

**मुंबई :** उन्हाळ्याच्या सुट्टीत मोठ्या संख्येने नागरिक बाहेरगावी जाण्यासाठी रेल्वे प्रवासाला प्राधान्य देतात. त्यामुळे रेल्वेमध्ये गर्दी वाढते. परिणामी, रेल्वे प्रशासन नियमित गाड्यांसोबत विशेष रेल्वेगाड्या चालवित आहे. परंतु, विशेष रेल्वेगाड्यांची सेवा मर्यादित तारखेपर्यंत असून त्यानंतर प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन प्रवाशांसाठी आणि अतिरिक्त गर्दी विभाजित करण्यासाठी राज्यांतर्गत विशेष



रेल्वेगाडीचा कालावधी जूनपर्यंत वाढविण्यात आला आहे. मध्य रेल्वेच्या या निर्णयाने प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन विशेष गाड्यांच्या सेवांचा कालावधी वाढविण्यात आला आहे. गाडी क्रमांक ०१४३५ सोलापूर - लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी २९ एप्रिलपर्यंत चालवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. आता या रेल्वेगाडीचा कालावधी ६ मेपासून २४ जूनपर्यंत वाढवण्यात आला आहे. तर, गाडी क्रमांक ०१४३६ लोकमान्य टिळक टर्मिनस सोलापूर साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी ३० एप्रिलपर्यंत धावणार होती. आता ही रेल्वेगाडी ७ मे ते २५ जूनदरम्यान धावणार आहे.



अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त बदलापूर गावातील उल्हास नदी तीरावरील छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला आमदार किसन कथोरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# गीतासार



## अध्याय ९
## राजविद्याराजगुह्ययोगः

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति । कौन्तेय प्रति जानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ९-३१ ॥

तो तात्काळ धर्मात्मा होतो आणि नेहमी टिकणाऱ्या परम शांतीला प्राप्त होतो. हे कौन्तेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), तू हे पक्के सत्य लक्षात ठेव की, माझा भक्त नाश पावत नाही. ॥ ९-३१ ॥

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः । स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ ९-३२ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), स्त्रिया, वैश्य, शूद्र तसेच पापयोनी अर्थात चांडाळादी कोणीही असो, ते सुद्धा मला शरण आले असता परम गतीलाच प्राप्त होतात. ॥ ९-३२ ॥

किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा । अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥ ९-३३ ॥

मग पुण्यशील, ब्राह्मण तसेच राजर्षी भक्तलोक मला शरण येऊन परम गतीला प्राप्त होतात, हे काय सांगावयास पाहिजे? म्हणून तू सुखरहित व नाशवंत या मनुष्यशरीराला प्राप्त होऊन नेहमी माझेच भजन कर. ॥ ९-३३ ॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु । मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥ ९-३४ ॥

माझ्यात मन ठेव. माझा भक्त हो. माझी पूजा कर. मला नमस्कार कर. अशा रीतीने आत्म्याला माझ्याशी जोडून मत्परायण होऊन तू मलाच प्राप्त होशील. ॥ ९-३४ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्याराजगुह्ययोगो नाम नवमोऽध्यायः ॥९॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील राजविद्याराजगुह्ययोगः नावाचा हा नववा अध्याय समाप्त झाला. ॥ ९ ॥

# "वेव्हज २०२५"
## माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला नवी दिशा
## ठाणे जिल्ह्यासाठी मोठी आशा

माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र आज एका महत्त्वपूर्ण वळणावर उभे आहे. तंत्रज्ञानाचा वेगवान विकास, जागतिकीकरण आणि प्रेक्षकांच्या बदलत्या आवडीनिवडींमुळे या क्षेत्रात नवीन संधी आणि आव्हाने निर्माण झाली आहेत. याच पार्श्वभूमीवर, देशातील माध्यम व मनोरंजन क्षेत्राच्या इतिहासातील एक सूवर्णक्षण म्हणून ओळखली जाणारी 'WAVES 2025' ही जागतिक परिषद मुंबईत दि.01 ते 04 मे 2025 या कालावधीत संपन्न होणार आहे. केवळ भारतच नव्हे, तर जागतिक स्तरावर माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला एकत्र आणणारा, नवसृजनाला चालना देणारा आणि गुंतवणुकीसाठी नवीन क्षितिजे निर्माण करणारा हा एक महत्त्वाचा मंच ठरणार आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, तंत्रज्ञानातील कौशल्य आणि येथील प्रतिभावान मनुष्यबळ यांचा संगम या परिषदेच्या केंद्रस्थानी असणार आहे.

### ठाण्याची भूमिका आणि महत्त्व:

मुंबई आणि महाराष्ट्राचे मनोरंजन क्षेत्रातील अनमोल योगदान सर्वश्रुत आहे. बॉलिवूड, टेलिव्हिजन आणि ओटीटी प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून या राज्याने नेहमीच देशाला आणि जगाला उत्कृष्ट मनोरंजन पुरविले आहे. आता 'WAVES 2025' च्या माध्यमातून याच मुंबईला आणि पर्यायाने महाराष्ट्राला जागतिक 'क्रिएटर हब' म्हणून नवी ओळख मिळविण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रयत्न होत आहे. ठाणे जिल्हा, जो मुंबई महानगर प्रदेशाचा एक अविभाज्य भाग आहे, या महत्त्वपूर्ण घडामोडींचा एक सक्रिय साक्षीदार आणि संभाव्य लाभार्थी ठरू शकतो.

ठाणे जिल्ह्यातही अनेक कलावंत, तंत्रज्ञ आणि उद्योजक माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात कार्यरत आहेत. मराठी चित्रपटसृष्टी, नाटक, मालिका आणि नवोदित डिजिटल माध्यमांमध्ये ठाण्यातील व्यक्ती आणि संस्थांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. 'WAVES 2025' सारख्या जागतिक परिषदेमुळे ठाण्यातील या प्रतिभा आणि उद्योगांना एक नवीन व्यासपीठ मिळू शकते. जागतिक स्तरावरील तज्ञ आणि उद्योजकांशी संवाद साधण्याची, नवीन कल्पनांची देवाणघेवाण करण्याची आणि गुंतवणुकीच्या संधी शोधण्याची संधी ठाण्यातील व्यक्तींना या परिषदेमुळे मिळू शकेल.

### 'ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी'कडे महाराष्ट्राची झेप आणि ठाण्याची तयारी:

ऑस्कर, कान्स आणि दावोससारख्या प्रतिष्ठित जागतिक परिषदेच्या धर्तीवर भारतात प्रथमच 'WAVES 2025' चे आयोजन होत आहे. जगभरातील 100 पेक्षा अधिक देशांतील प्रतिनिधी यामध्ये सहभागी होणार आहेत, ही बाब भारतासाठी आणि विशेषतः महाराष्ट्रासाठी गौरवाची आहे. 'ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी'मध्ये महाराष्ट्राला एक महत्त्वपूर्ण स्थान मिळवून देण्यासाठी हे एक मोठे पाऊल आहे.

ठाणे जिल्ह्याला या संधीचा पुरेपूर लाभ घेण्यासाठी आतापासूनच तयारी करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील कला, संस्कृती आणि मनोरंजन क्षेत्रातील क्षमता जगासमोर आणण्यासाठी योग्य नियोजन आणि प्रभावी रणनीती आखण्याची गरज आहे. स्थानिक पातळीवर उत्कृष्ट दर्जाचे निर्मिती केंद्र (Production Hubs) विकसित करणे, कुशल मनुष्यबळ तयार करणे आणि जागतिक मानकांनुसार पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.

### 'WAVES बाजार': ठाण्यासाठी संधींचे दालन:

'WAVES 2025' मध्ये आयोजित 'WAVES बाजार' हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि आकर्षक व्यासपीठ आहे. हे एक इंटरॅक्टिव्ह व्यावसायिक व्यासपीठ असून, जिथे खरेदीदार आणि विक्रेते थेट संवाद साधू शकतात. नवीन प्रकल्पांची ओळख, सर्जनशील कल्पना आणि गुंतवणुकीच्या संधी येथे उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे, श्रेणीआधारित शोध प्रणाली (Category-based search system) आणि सुरक्षित मेसेजिंग सुविधेमुळे व्यवहार अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठरतील.

ठाण्यातील निर्माते, दिग्दर्शक, लेखक, तंत्रज्ञ आणि वितरक यांच्यासाठी 'WAVES बाजार' एक मोठी संधी घेऊन येऊ शकते. त्यांना त्यांचे प्रकल्प जागतिक स्तरावरील खरेदीदारांसमोर मांडण्याची, सहकार्यासाठी नवीन भागीदार शोधण्याची आणि आपल्या कामासाठी गुंतवणूक आकर्षित करण्याची संधी मिळेल. 'WAVES बाजार' च्या माध्यमातून ठाण्यातील कला आणि संस्कृतीला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवणे शक्य होईल.

### परिषदेतील विविध सत्रे आणि ठाण्यासाठी उपयुक्तता:

'WAVES 2025' मध्ये आयोजित होणारी विविध सत्रे ज्ञान आणि अनुभवाचा खजिना असणार आहेत. जागतिक उद्योग नेते, विचारवंत आणि नवोन्मेषक विविध विषयांवर मार्गदर्शन करतील, जे ठाण्यातील उद्योजकांसाठी आणि नवोदितांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

**परिषद सत्रे:** जागतिक स्तरावरील तज्ञांचे विचार ऐकणे, त्यांच्या अनुभवांबद्दल जाणून घेणे आणि भविष्यातील ट्रेंड्स समजून घेणे ठाण्यातील व्यावसायिकांसाठी दिशादर्शक ठरू शकते.

**मीडिया मार्केटप्लेस:** भारताच्या माध्यम व मनोरंजन क्षेत्रातील विविधता आणि क्षमतांचे प्रदर्शन पाहणे आणि त्यातून प्रेरणा घेणे ठाण्यातील निर्मात्यांसाठी महत्त्वाचे आहे. या प्रदर्शनातून नवीन कल्पना आणि तंत्रज्ञान आत्मसात करता येऊ शकते.

**तंत्रज्ञान प्रदर्शन:** नवीन तंत्रज्ञान आणि सर्जनशील प्रकल्पांचे लाईव्ह डेमो पाहणे ठाण्यातील तंत्रज्ञांना आणि नवोद्योजकांना नवीन संधींची कल्पना देऊ शकते. व्हर्च्युअल रिॲलिटी (VR), ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रम:** भारताच्या समृद्ध कलासंपदेची झलक दाखवणारे बहारदार कार्यक्रम पाहणे केवळ मनोरंजकच नाही, तर आपल्या सांस्कृतिक परंपरांना जागतिक स्तरावर कसे सादर करावे, याची शिकवण देतात. ठाण्यातील कलाकारांना या कार्यक्रमांमधून प्रेरणा मिळू शकते.

लेखक
मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

### नव्या कल्पनांना दिशा आणि ठाण्याची जबाबदारी:

माध्यम आणि मनोरंजन उद्योग सध्या एका मोठ्या बदलातून जात आहे. पारंपरिक माध्यमांसोबतच डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा वाढता प्रभाव आणि प्रेक्षकांच्या बदलत्या आवडीनिवडी यामुळे नवनवीन कल्पनांना वाव मिळत आहे. 'WAVES 2025' ही परिषद याच नव्या कल्पनांना दिशा देऊन, भारताला जागतिक M&E सुपरपॉवर बनवण्याचा पाया रचणार आहे. सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक भागीदारी यांचा योग्य समन्वय साधून, भारताला 'ग्लोबल कंटेंट डेस्टिनेशन' बनवण्याचे स्वप्न या मंचाद्वारे साकार होणार आहे.

ठाणे जिल्ह्याची यात एक महत्त्वाची भूमिका आहे. जिल्ह्यातील कला आणि मनोरंजन क्षेत्रातील क्षमता ओळखून, त्यांना योग्य प्रोत्साहन देणे आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी तयार करणे ही आपली जबाबदारी आहे. यासाठी शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात समन्वय साधणे, कौशल्य विकास कार्यक्रमांना चालना देणे आणि नवोद्योजकांना मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

### प्रधानमंत्री, केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्र्यांची उपस्थिती: एक सकारात्मक संकेत:

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या प्रमुख व्यक्तींची 'WAVES 2025' मध्ये उपस्थिती असणे, या परिषदेच्या महत्त्वाला आणि सरकारच्या या क्षेत्राकडे असलेल्या सकारात्मक दृष्टिकोनाला अधोरेखित करते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पाठिंब्याने भारतीय माध्यम आणि मनोरंजन उद्योग निश्चितच एक नवीन उंची गाठेल.

ठाणे जिल्ह्याने या संधीचा लाभ घेण्यासाठी सक्रियपणे पुढे यायला हवे. जिल्ह्यातील उद्योजक, कलावंत आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी एकत्रितपणे काम करून 'WAVES 2025' मध्ये प्रभावीपणे सहभागी होण्याची गरज आहे. आपल्या क्षमतांचे योग्य प्रदर्शन करणे, जागतिक स्तरावरील संबंध प्रस्थापित करणे आणि गुंतवणुकीच्या संधींचा शोध घेणे हे ठाण्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरू शकते.

'WAVES 2025' केवळ एक परिषद नाही, तर भारतीय माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एक नवीन युगाची सुरुवात आहे. ठाणे जिल्ह्यासाठी ही परिषद अनेक संधी घेवून आली आहे. जिल्ह्यातील कला, संस्कृती आणि उद्योगांना जागतिक स्तरावर ओळख मिळवण्याची, नवीन तंत्रज्ञान आणि कल्पना आत्मसात करण्याची आणि आर्थिक विकासाला चालना देण्याची ही उत्तम संधी आहे. या संधीचा पुरेपूर उपयोग करून, ठाणे जिल्हा देखील 'ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी'मध्ये आपले महत्त्वपूर्ण स्थान निश्चित करू शकतो. यासाठी योग्य नियोजन, सक्रिय सहभाग आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. चला तर मग, 'WAVES 2025' च्या माध्यमातून ठाण्याच्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला नवी दिशा देवू या..!

# राष्ट्रनिष्ठा व बलवान पिढी घडवणं मिलिटरी स्कूलचे ध्येयं - कर्नल शंकरराव यादव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शिवनिकेत ट्रस्ट संचालित भारतीय सैनिकी विद्यालय, खडवली पूर्व च्या माध्यमातून, मुंबई व ठाणे परिसरातील इयत्ता ६ वी ते १२ वी च्या मुला-मुलींसाठी टॅलेन्ट सर्च परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेष कौतुकाची बाब म्हणजे नुकतीच इयत्ता १० वीची परीक्षा दिलेल्या काही मुलींनी एनडीएची तयारी करून भारतीय सैन्य दलात जाण्याची इच्छा व्यक्त केली. टॅलेन्ट सर्च परीक्षा संपल्यानंतर भारतीय सैनिकी विद्यालयाचे कमांडंट कर्नल शंकरराव यादव (री) यांनी पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कमांडंट यादव म्हणाले, भारतीय सैनिकी विद्यालय ही



शाळा, मुंबई व ठाणे परिसरातील एकमेव मिलिटरी स्कूल असून कल्याण तालुक्यातील, महागणपती टिटवाळा जवळील खडवली पूर्व येथे असून शाळा महाराष्ट्र शासनमान्य अनुदानित शाळा आहे. शाळेच्या माध्यमातून इयत्ता ६ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना उत्तम व दर्जेदार शिक्षण तर देतोच त्याचबरोबर त्यांची शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी कठोर मिलिटरी प्रशिक्षण देतो.

त्याच बरोबर मुख्याध्यापक महेश भावसार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रनिष्ठा जागृत करणारे संस्कारक्षम पाठ दिले जातात. आमची शाळा ही फक्त मुलांची असून इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा आहे. मिलिटरी स्कूल असल्यामुळे आम्ही प्रदीर्घ अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची यूपीएससी, एसएसबी व एनडीए परीक्षांची विशेष तयारी करुन घेतो. महाराष्ट्र शासनाच्या अनुदानातून सुरु होणारा मागील काही वर्षातील प्रलंबित ऑलिंपिक दर्जाचा ५० मी. X २५ मी. लांब जलतरण तलावाचा महत्वाकांक्षी प्रकल्प यावर्षी पूर्ण होऊन विद्यार्थ्यांच्या वापरात येणार आहे.

तसेच विद्यार्थ्यांना हॉर्स रायडिंग साठी उत्तम जातिवंत घोडे लवकरच शाळेत दाखल होणार आहेत. आमची शाळा क्रीडा क्षेत्रात अव्वल असून, फुटबॉल, व्हॉलिबॉल, बास्केटबॉल, बॉक्सिंग, खो खो, कबड्डी, आट्या पाट्या, तायक्वांडो, मल्लखांब, जितकुंदो यांसारख्या अनेक खेळात जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्पर्धांमध्ये प्राविण्य संपादन करते. ज्या विद्यार्थ्यांना भारत मातेच्या सेवेसाठी सैन्य दलात जाण्याची इच्छा आहे अशा मुलांच्या पालकांनी लवकरात लवकर भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यावा, असे आवाहन शाळा समिती अध्यक्षा राजेश्वरी शिंदे यांनी केले.

# पेणमध्ये 'उत्तुंग' मुलाखतींचा कार्यक्रम संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : मराठी साहित्य मंडळ पेण आणि अहिल्या महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी माध्यमातून शिकलेल्या आणि जीवनात यशोशिखर गाठणाऱ्या तीन व्यक्ती रेखांच्या 'उत्तुंग' मुलाखतीचा कार्यक्रम नुकताच पार पडला. डॉ.गीता वनगे (शास्त्रज्ञ), उदय साठे(बिल्डर डेव्हलपर) आणि हेमंत म्हात्रे (उद्योजक) आदींचा जीवन प्रवास उपस्थितांना ऐकता आला.मुलाखतकार म्हणून अश्विनी गाडगीळ आणि विनायक गोखले यांनी निमंत्रितांना विविध विषयांवर बोलते केले.कार्यक्रमाच्या सुरवातीला मराठी साहित्य मंडळ अध्यक्ष डॉ.देवीदास बामणे यांनी पुस्तक स्वरूपात भेट वस्तू देऊन निमंत्रितांचे स्वागत केले.कार्यक्रमास मराठी साहित्य मंडळ पेण सचिव वैभव धनावडे,माजी अध्यक्षा विभावरी जोशी,माजी सचिव बाळकृष्ण कमळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पेण मधील डॉक्टर, बिल्डर, वकील, व्यावसायिक आणि विविध कार्यक्षेत्रात आपले विशेष योगदान देत राहणाऱ्या व्यक्तींची उपस्थिती कार्यक्रमास लाभली.

मराठी शाळांमधून शिकवून अपार मेहनत, सातत्य या जोरावर यश सहज प्राप्त करता येते हा संदेश देताना आपल्या यशात आपले कुटुंब आणि मार्गदर्शक यांचा मोलाचा वाटा आहे असे निमंत्रितांनी बोलून दाखविले.

# डोंबिवलीत 'एक रात्र कवितेची' कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : काव्य रसिक मंडळाच्या माध्यमातून एक रात्र कवितेची हा कार्यक्रम तब्बल आठ तास सावरकर उद्यान येथील डोंबिवलीकर कल्चरल क्लब सभागृहात झाला. कवी अशोक नायगावकर, कवी गझलकार वैभव देशमुख आणि कवयित्री शशी डंभारे यांच्यासह ५० हून अधिक कवींनी आपल्या कविता सादर केल्या.कार्यक्रमाच्या पहिल्या फेरीत कवींनी आपल्या कविता सादर केल्या, तर दुसऱ्या फेरीत रसिकांनी आपल्या आवडत्या कविता म्हटल्या. कार्यक्रमात विविध विषयांवरील कविता सादर करण्यात आल्या. त्यात रॅप कविता, लावणी, गाणी तसंच मुक्तछंद कवितांचा समावेश होता.उपस्थित कविता रसिकांच्या विनंतीनुसार नायगावकरांनी नेहमीच्या कविता सादर न करता, नवीन वेगळ्या कविता सादर केल्या. त्यांच्या मिष्कील स्वभावामुळे त्यांच्यावर हास्यकवी म्हणून ठपका बसला आहे. पण त्यांनी या कार्यक्रमात कवितांमधून मार्मिकपणे समाजातील व्यंगावर अगदी परखड ताशेरे ओढले. गीतकार, गजलकार वैभव देशमुख यांनी त्यांच्या कविता आणि गाऊन म्हटलेल्या गजलांनी रसिकांना मंत्रमुग्ध करुन टाकलं. यंदाचे वर्ष मंडळाचे हीरकमहोत्सवी वर्ष असुन पाडव्याच्या शोभायात्रेत भाग घेऊन उपक्रमांना सुरवात झाली. त्यानंतर मुक्तछंद या विषयावर एक दिवसीय कार्यशाळाही झाली आणि एक रात्र कवितेची हा मंडळाचा महत्वाचा कार्यक्रम अतिशय थाटात पार पडला.

# मंत्री कु. आदिती तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या 66 व्या स्थापना दिनोत्सवानिमित्त गुरुवार 1 मे 2025 रोजी सकाळी 8.00 वाजता अलिबाग येथील पोलीस परेड ग्राऊंडवर महिला व बालविकास मंत्री कु.आदिती वरदा सुनील तटकरे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. मुख्य शासकीय समारंभ सकाळी 8.00 वाजता असल्यामुळे इतर कार्यालय अगर संस्था यांनी आपल्या कार्यालयात ध्वजवंदनाचा कार्यक्रम सकाळी 7.15 वा.पूर्वी किंवा सकाळी 9 वा.च्या नंतर करावा. या मुख्य शासकीय समारंभासाठी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन ("B"Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2025-2026
BAMMC MASS MEDIA
M.A. C&J COMMUNICATION & JOURNALISM
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

# आदिवासी विकास महामंडळाकडून पालकमंत्र्यांना साकडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : ठाणे जिल्ह्यात मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या (धान) भाताचे पैसे आदिवासी विकास महामंडळाकडून मिळण्यासाठी आज ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शेतकऱ्यांच्यावतीने मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघाचे माजी चेअरमन प्राध्यापक प्रकाश पवार व सहकारी यांनी साकडे घातले.

- ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात आदिवासी विभागात आदिवासी विकास महामंडळातर्फे धान भात खरेदी करीत असते. खरीप हंगाम २०२४-२०२५ मध्ये मुरबाड तालुक्यातील माळ खरेदी केंद्रावर एकूण ११६६ शेतकऱ्यांनी धान्याची विक्री केली होती त्यापैकी फक्त २३३ शेतकऱ्यांना आज पर्यंत धानाचे पैसे मिळाले असून धसई भात खरेदी केंद्रावर एकूण ५४७ शेतकऱ्यांनी धान्याची विक्री केली असून फक्त २६१ शेतकऱ्यांना धानाची रक्कम मिळालेली आहे तसे पाहता धानाचे पैसे शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२५ पूर्वी मिळाला पाहिजे होते म्हणजेच शेतकऱ्यांनी घेतलेले बँक,सेवा सोसायटीकडूनचे पीक कर्जावरील व्याजाची माफी मिळाली असती परंतु त्याचा भुर्दंड ही आज शेतकऱ्यांना बसला आहे. आज पर्यंत माळ खरेदी केंद्रावर ९३३ शेतकरी व धसई खरेदी केंद्रावर अंदाजे १५० शेतकऱ्यांना धनाचे रक्कम मिळालेली नाही, महामंडळाकडे यासंबंधी विचार न केली असता शेतकऱ्यांची ऑनलाइनमधील अडचणी सांगतात शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२४-२०२५ मध्ये पीक पेराची नोंद केली नाही ऑनलाइन करताना फोटो बरोबर अपलोड केला नाही अशी अनेक कारणे सांगण्यात येत आहेत

- आज ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री मुरबाड तालुक्यात कळंभे या ठिकाणी येणार असल्याचे समजताच मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघाचे माजी चेअरमन प्रकाश पवार,माजी जि प सदस्य संजय पवार,आदिवासी समाज संघटना अध्यक्ष रघुनाथ खाकर,शेतकरी प्रतिनिधी अशोक पठारे,विलास घरत, यशवंत विशे, संतोष मोरे,चंदर भला यांनी पालकमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्यावतीने निवेदन देऊन खरीप हंगाम २०२४-२५ मधील सातबारा वरील पीक पेराची नोंद व इतर अटी शिथिल करावी व मुरबाड तालुक्यातील आदिवासी भागातील शेतकऱ्यांना धनाचे पैसे लवकरात लवकर मिळण्याचे साकडे घालण्यात आले ह्या निवेदनाची प्रत तहसीलदार मुरबाड यांनाही देण्यात आली असून लवकरच आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांना भेटी देऊन निवेदन देण्यात येणार आहे.

## रेसिपी
# मटकीचे कटलेट



### ... मटकीचे कटलेट बनवण्याचे साहित्यः

१ वाटी मोड आलेली मटकी १ आठ्याचा तुकडा १ बारीक चिरलेला कांदा ४-५ मिरच्या १/२ वाटी कोथिंबीर चवीनुसार मीठ तेल आवश्यकतेनुसार मटकीचे कटलेट बनवण्याची

### कृतीः

सर्वप्रथम एका मिक्सरच्या भांडवात मोड आलेली मटकी, आलं, मिरच्या, कोचिचीर वाटून घ्या. आता एका बाऊलमध्ये हे मिश्रण काढून त्यात मीठ, बारीक चिरलेला कांदा मिक्स करा आणि त्याचे कटलेटच्या आकारचे चपटे गोळे बनवा आता एका पॅनमध्ये थोर्ड तेल ओतून तयार केलेले मटकीचे कटलेट दोन्ही बाजूने लालसर होईपर्यंत भाजून घ्या. एका प्लेटमध्ये सॉसबरोबर मटकीच्या चविष्ट आणि पौष्टिक कटलेटचा आस्वाद घ्या.

# बसखाली सापडून विद्यार्थ्याचा मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** कल्याण पश्चिमेत बिर्ला महाविद्यालयाजवळ बुधवारी दुपारी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसच्या मागील चाकाखाली येऊन दुचाकीवरील एक तरूण चिरडला गेला. या तरूणाचा जागीच मृत्यू झाला. हा तरूण बिर्ला महाविद्यालयाचा विद्यार्थी होता. अमनकुमार दुबे (१७) असे बस अपघातात मरण पावलेल्या विद्यार्थ्यांचे नाव आहे. बुधवारी दुपारी महाविद्यालय सुटल्यानंतर अमनकुमार दुबे महाविद्यालयातून बाहेर पडला. तो दुचाकीवरून आपल्या घरी निघाला होता. बिर्ला महाविद्यालयासमोरील रस्ता मुंबई-मुरबाड-अहिल्यानगर महामार्गावरील सर्वाधिक वर्दळीचा रस्ता आहे. या रख्यावरून जात असताना अमनकुमार दुबे एका एसटी बसच्या समांतर दुचाकी चालवित होता. बस चालक त्याच्या वेगात बस पुढे नेत होता. अचानक अमनकुमार दुबे दुचाकीसह तोल जाऊन बसच्या मागच्या चाकाखाली आला. त्याचा तोल जाऊन तो पडला असल्याची प्राथमिक माहिती आहे. दुचाकीवरून तरुण बसच्या मागच्या चाकाखाली येताच इतर वाहन चालक आणि पादचाऱ्यांनी ओरडा केला. घटना घडताच चालकाने जागीच बस थांबवली, मागच्या चाकाखाली आल्याने अमनकुमार दुबेची गंभीर स्थितीत होता. त्याला तातडीने या रस्त्यावरील गस्तीवरील वाहतूक पोलिसांनी रुग्णवाहिकेच्या माध्यमातून जवळच्या रुग्णालयात नेले. नंतर त्याला पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात नेले. एसटी बस राजगुरूनगर बस आगाराची होती. महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या अपघातानंतर बिर्ला महाविद्यालयासमोरील रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. सर्व प्रकारची वाहने मुख्य आणि अंतर्गत रस्त्यावर अडकून पडली. स्थानिक पोलीस येऊन पंचनामा झाल्यानंतर वाहतूक पोलिसांना या भागातील कोंडी सोडवली.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# पेंढारकर महाविद्यालयावर प्रशासक म्हणून डॉ. विजय नारखेडे यांची नियुक्ती

## आमदार निरंजन डावखरे यांच्याकडून नारखेडेंना शुभेच्छा




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कोकण विभागाचे उच्च शिक्षण, सहसंचालक डॉ. विजय नारखेडे यांची डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाच्या, के. वि. पेंढारकर महाविद्यालयावर प्रशासक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल आमदार निरंजन डावखरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

के. वि. पेंढारकर महाविद्यालयाच्या कारभारात गेले काही महिने अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले होते. त्याअनुषंगाने डावखरे यांनी अधिकाऱ्यांसह उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची भेट घेतली. हा प्रश्न उपस्थित करणाऱ्या महाराष्ट्र धर्मनिरपेक्ष शिक्षक संघटनेचे अध्यक्ष प्रा. विजय पवार, उपाध्यक्ष डॉ शशिकांत माघडे, सचिव डॉ निर्मला पवार, खजिनदार डॉ संदेश डोंगरे, डॉ मुनीश पांडे ह्या पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून हा सर्व वृत्तांत शिक्षण मंत्र्यांना सांगून ह्या प्रसंगाचे गांभीर्य समजावून सांगितले.

त्यानुसार शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्याकरिता तात्काळ निर्देश दिले आणि पुढील हालचालींना वेग आला. अखेर सर्वांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले.

डॉ. विजय नारखेडे यांचा शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, कार्यकुशलतेमुळे महाविद्यालयाचा शैक्षणिक व प्रशासकीय कारभार अधिक प्रभावी आणि पारदर्शी होईल असा विश्वास आमदार निरंजन डावखरे यांनी त्यांच्या नियुक्ती नंतर व्यक्त करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



### कल्याण डोंबिवली मनपाक्षेत्रातील

# महिला सेवांबाबत मार्गदर्शन शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता :

**कल्याण :** महाराष्ट्र राज्यामध्ये नागरिकांना सेवेचा हक्क देणारा कांतीकारी कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५, या कायद्यान्वये राज्याच्या नागरिकांना पादरर्शक, गतिमान व कालवध्द सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची अंमलबजावणी करण्यात आलेली असून, नागरिकांची कामे कालमर्यादत होण्याच्या दृष्टीने या अधिनियम लागू करण्यात आला आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका मार्फत राज्य शासनाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त -२ यांच्या आदेशानुसार महापालिकेतील महिला व बालकल्याण विभागामार्फत महापालिका क्षेत्रातील बचत गटातील महिलांना व इतर महिलांना महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार सुरु करण्यात आलेल्या सेवांबाबत मार्गदर्शन शिबीराचे आयोजन दिनांक २९/०४/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता कॉन्फरन्स हॉल, आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण येथे करण्यात आले होते.

या शिबीरामध्ये सदर कायदयाबाबत व महापालिकेने कार्यान्वित केलेल्या विविध विभागांच्या सेवेबाबत माहिती देण्यात आली. महापालिका क्षेत्रातील अनेक महिलांनी यामध्ये सहभाग घेतला होता. त्याचप्रमाणे महापालिकेचे अधिकारी/ कर्मचारी देखील उपस्थित होते.


# अनधिकृत नळ जोडण्यांवर भिवंडी मनपाची कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिके तर्फे अनधिकृतपणे नळ कनेक्शन घेणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आली. याबाबत अधिकृत प्रसिद्धिपत्रकामार्फत पालिकेने सविस्तर खुलासा केला आहे.

1) दि.३०/०४/२०२५१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिति क्र.२ अंतर्गत मौजे-नागाव, घर नं.९८४/१, दुर्गा कंपाऊंड, भिवंडी येथे पाहणी केली अस्ता त्याठिकाणी श्री रणजीत बाफना यांनी मोती कारखान्याकरीता मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेचा रस्ता खोदून अनधिकृतपणे जलवाहिनीला छिद्र पाडून १/२" व्यासाचे (औद्योगिक) नळ कनेक्शन अनाधिकृत घेतल्यामुळे (१/२" औद्योगिक १ कनेक्शन × रु.१२,०००/- ५ वर्षांचे) = रु.६०,००० /-, व रस्त्याचे नुकसान (डांबरी रोड ३३६ रनिंग मिटर ११९ मिटर रस्ता) रु.३९,९८४/-असे एकूण रु. ९९,९८४/- (अक्षरी रु. नव्याणव हजार नावूशे चर्व्याणव रु. मात्र) नुकसान झाले आहे. सदर अनधिकृतपणे रस्त्याची खोदाई करुन पाईप लाइन टाकणारे श्री रणजीत बाफना यांच्या विरोधात शांतीनगर पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं २०२३ चे कलम ३२४ (४) (५), ३२६ (क), ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

२) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिति क्र.२ अंतर्गत मौजे-नागाव घर नं.१२०९, दुर्गा कंपाऊंड, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी श्री वासुदेव खामकर यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेचा रस्ता खोदून अनधिकृतपणे महानगरपालिकेच्या जलवाहिनीला छिद्र पाडून १/२" व्यासाचे (औद्योगिक) २ व १"व्यासाचे (औद्योगिक) २ नळ कनेक्शन अनाधिकृत घेतल्यामुळे (१/२" औद्योगिक × २ कनेक्शन × रु.१२ ,०००/- ५ वर्षांचे) = रु.१,२०,०००/-, १" व्यासाचे (औद्योगिक) २ नळ कनेक्शन अनाधिकृत घेतल्यामुळे (१" औद्योगिक २ कनेक्शन × रु.७८,०००/- × ३ वर्षांचे )= रु.४,६८,०००/- व रस्त्याचे नुकसान (डांबरी रोड ३३६ रनिंग मिटर १३९ मिटर रस्ता) रु .४६,७०४/-असे एकूण रु. ६,३४,७०४/- (अक्षरी रु. सहा लाख चवतीस हजार सातशे चार रु. मात्र) नुकसान झाले आहे. सदर अनधिकृतपणे रस्त्याची खोदाई करुन पाईप लाइन टाकणारे श्री वासुदेव खामकर यांच्या विरोधात शांतीनगर पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं २०२३ चे कलम ३२४(४) (५),३२६ (क), ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहेसदरची कारवाई मा. प्रशासक तथा आयुक्त सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता श्री संदीप पटणावर पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मा. उप अभियंता श्री. उद्धव गावडे यांचे अधिपत्याखाली श्री विराज भोईर (पथक प्रमुख), अरफात खान, रत्नदीप भालेराव यांचे मार्फत करण्यात आली; अशी माहिती पालिकेचे कार्य. अभियंता संदीप पटणावर यांनी दिली




# पनवेल तालुका 'शेकाप'मध्ये फूटीचे संकेत
# जे. एम. म्हात्रे मविआ'तून बाहेर पडणार ?



> 'बैठकीत मी महाविकास आघाडीतून वैयक्तिक बाहेर पडल्याचा निर्णय जाहीर केला. मी अजूनही कोणत्याही इतर राजकीय पक्षात जाण्याचा निर्णय घेतलेला नाही. मी या क्षणापर्यंत 'शेकाप'मध्ये आहे ! - जे. एम. म्हात्रे

> आमचे सहकारी जे. एम. म्हात्रे यांना आम्ही महाविकास आघाडीत राहूनच इतर राजकीय पक्षांशी स्पर्धा करू शकतो हे गणित समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी महाविकास आघाडीत राहण्यास विरोध दर्शविला आहे,
> - माजी आमदार बाळाराम पाटील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** स्वतंत्र्यपूर्व काळापासूनची राजकीय परंपरा सांगणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाला (शेकाप) सध्या उतरती कळा लागली आहे. त्यातच पनवेल व उरण तालुक्यांमध्ये या पक्षाला आर्थिक रसद पुरविणारे ज्येष्ठ नेते आणि उद्योजक जे. एम. म्हात्रे यांनी स्वतः मंगळवारी पनवेल 'शेकाप'च्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या बैठकीत महाविकास आघाडीतून बाहेर पडत 'एकला चलो'चा निर्णय जाहीर केला. यामुळे 'शेकाप'मध्ये भविष्यात मोठी फूट पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

दीड महिन्यांपूर्वी म्हात्रे यांनी मध्यवर्ती कार्यालयात पदाधिकारी व स्थानिक नेते यांची बैठक लावून महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घ्या, असे आवाहन पक्ष नेतृत्वाकडे केले होते. या दरम्यान पक्षाच्या १४ माजी नगरसेवकांमधील सत्तेत नसल्याने अस्वस्थता वाढल्याने 'शेकाप'ला नवी दिशा देण्याचे बेत आखले जात होते. म्हात्रे यांच्या प्रश्नावर कोणताच निर्णय 'शेकाप'च्या नेत्यांनी न घेतल्यामुळे म्हात्रे यांनी मंगळवारी पदाधिकाऱ्यांची दुसरी बैठक बोलावून स्वतः महाविकास आघाडीतून बाहेर पडत असल्याचा निर्णय जाहीर केला.

## भाईंदरच्या पं. भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात
# मोफत सीटीस्कॅन सुविधेचा शुभारंभ



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** भाईंदर पश्चिम येथील पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात अखेर मोफत सुविधा देणारे सीटीस्कॅन यंत्र सुरु करण्यात आले. यामुळे गरजू रुग्णांना उपचारासाठी मोठा याचा फायदा होणार आहे. भाईंदर पश्चिम येथे पंडित भीमसेन जोशी रुग्णालय आहे. या रुग्णालयाची उभारणी २०१६ साली महापालिकेकडून करण्यात आली होती. परंतु आर्थिक दृष्ट्या हे रुग्णालय चालवणे पालिकेला शक्य नसल्याने २०१९ साली ते राज्य शासनाकडे हस्तांतरित करण्यात आले. तेव्हा पासून या रुग्णालयाची संपूर्ण जबाबदारी ही राज्य शासनाच्या आरोग्य विभागामार्फत पार पडली जात आहे. परंतु शासनाकडून पुरेश्या प्रमाणात निधी उपलब्ध होत नसल्यामुळे रुग्णालयात तज्ञ डॉक्टर इतर आवश्यक गोष्टीची कमतरता आहे. परिणामी रुग्णालयात मोजक्याच आजारावर उपचार केले जात आहे.

त्यामुळे आता यात वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाकडून पर्यायी मार्गांचा अवलंबन करून यंत्रणा उभारण्याचा पर्याय शोधण्यात आला आहेत. त्यानुसार नुकतीच सिटीस्कॅन यंत्राची उभारणी करण्यात आली आहे. सोमवारी याचे उदघाटन आमदार नरेंद्र मेहता यांच्या हस्ते करण्यात आले. शासकीय रुग्णालयात ही यंत्रणा उभारली असल्याने यापुढे आता मेंदूच्या आजारासह मान, मणका, छाती, ओटीपोट, पोट आदी भागांमधील आजारांच्या निदानासाठी आलेल्या रुग्णांना मोफत सीटीस्कॅन करता येणार आहे.

भागीदारीमध्ये यंत्रणा यापूर्वी रुग्णालयात सिटीस्कॅन यंत्रणा नसल्यामुळे रुग्णांना ही तपासणी खासगी प्रयोग शाळेत जाऊन करावी लागत होती.यासाठी मोठा खर्च उचलवा लागतो.यावर उपाय म्हणून शासनाने कृष्णा डायग्नोस्टिक लॅबला रुग्णालयात जागा देण्याचे ठरवले आहे.यात खासगी भागीदारी पद्धतीने रुग्णालय सिटीस्कॅन यंत्रनेची उभारणी करण्यात आली आहे.यामुळे रुग्णालयातील दाखल रुग्णांची मोफत तर अन्य रुग्णांना सवलती दरात तपासणी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

## आमदार सुलभा गायकवाड यांच्याकडून
# कल्याण पूर्वेतील नालेसफाईचा आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण पूर्व विधानसभा क्षेत्रातील खडेगोलवली आणि वालधुनी परिसरातील प्रमुख नाल्यांची पाहणी केली. दरवर्षी नाल्यांची वेळेवर आणि योग्य प्रकारे सफाई न झाल्याने सखल भागांमध्ये पाणी साचून पूरपरिस्थिती निर्माण होते. नागरिकांना या समस्येला दरवर्षी सामोरे जावे लागते.

या पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आमदार सुलभाताई गायकवाड यांनी पालिका अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष स्थळावर जाऊन नाल्यांची पाहणी केली आणि पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची युद्धपातळीवर सफाई करण्यात यावी, अशी स्पष्ट मागणी केली. यावेळी शहर अभियंता अनिता परदेशी यांनी लवकरच नाले सफाईचे काम सुरू होईल व मी स्वतः यावर लक्ष ठेवीन, अशी ग्वाही दिली.

या पाहणी दौऱ्याला भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अभिमन्यू गायकवाड, १४२ विधानसभा निवडणूक प्रमुख संजय मोरे, कल्याण पूर्व तिसगांव खडेगोलीवली मंडळ अध्यक्ष संतोष शेलार, कल्याण पूर्व ग्रामीण मंडळ अध्यक्ष नितेश म्हात्रे अधिकारी, मा नगरसेवक मनोज राय,बाळा म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्त्या वंदनाताई मोरे, लक्ष्मण आंबोकर, अर्चना नागपुरे, क.डों. म.पा. कार्यकरी अभियंता बांधकाम विभाग श्री सांगळे, कार्यकारी अभियंता मलनि:सारण विभाग श्री नवांगुळ, 'ड' प्रभाग अधिकारी उमेश यमगर, 'जे' प्रभाग अधिकारी सचिन तामखेडे तसेच इतर अधिकारी कर्मचारी आणि भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.





# पाकिस्तानी लष्कराच्या जवानांनी सीमारेषेजवळील चौक्या सोडल्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सीमारेषेवर प्रचंड तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानी लष्कराकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन करत गोळीबार केला गेला. त्याला भारतीय लष्कराकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात येत आहे. अशातच एक महत्वाची माहिती समोर आली की, पाकिस्तानी लष्कराच्या जवानांनी सीमारेषेजवळील चौक्या रिकाम्या गेल्या आहेत. चौक्यांवरील झेंडेही उतरवण्यात आले आहेत.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| X | https://x.com/@Jeevandeepvarta |
| Facebook | https://www.facebook.com/jeevandeepnews |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep |
| Web | https://jeevandeepvarta.com |



# युवा संस्कार संस्थेकडून शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : युवा संस्कार बहुउद्देशीय संस्था ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांसोबत शिक्षण ह्या विषयावर काम करते. ग्रामीण भागातील शिकलेली मुलेच विविध गावात एज्युकेटर म्हणून काम करतात. ग्रामीण भागात शिक्षणाबद्दल असलेली अनास्था आणि इतर सोयी सुविधाची असलेली वाणवा ही स्थिती लक्षांत घेता संस्थेच्या माध्यमाने याचं गावात ज्या विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण प्राप्त केले आहे त्यांना एज्युकेटर म्हणुन तयार केले जाते आणि त्यांच्या माध्यमाने इतर मुलांना मोफत शिक्षण देण्याचे काम संस्था करत आहे.

या एज्युकेटर विद्यार्थ्यांना देखील प्रशिक्षणाची गरज लक्षात घेत त्यांना संस्थेच्या वतीने चार दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. यात शिक्षकांची भुमिका, आदर्श विद्यार्थी, पपेट शो, कथाकथन, शिक्षणाचे माध्यम व साहित्य निर्मिती या विषयांवर चर्चा आणि प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. हे प्रशिक्षण मुंबई मोबाईल क्रश ह्या संस्थेच्या माध्यमातून घेण्यात आले आणि यात आडिवली, दहिवली, कोसले, चवरे, म्हसरुंडी, कोणावाडी, कुंदे, मामनोली, बेलकरपाडा, दहागाव ह्या गावातील 13 एज्युकेटर उपस्थित होते. ग्रामीण भागांत शिक्षण विषयक जनजागृतीची व्यापक चळवळ उभारून सर्व समाज घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे संस्थेचे संस्थापक सोमनाथ राऊत यांनी समारोप प्रसंगी सांगितले.



## मंत्रिमंडळ निर्णय

### केंद्राच्या पीएम शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचना लागू करणार

प्रधानमंत्री – यंग अचिव्हर्स स्कॉलरशिप अॅवार्ड स्किम फॉर व्हायब्रंट इंडिया (PM- YASASVI ) या एकत्रिकृत शिष्यवृत्ती योजनेच्या केंद्राच्या मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या योजनेंतर्गत ओबीसी आणि डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिक पूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र सरकारने २०२१-२२ ते २०२५-२६ वर्षांकरिता जारी केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना लागू करण्यात आल्या आहेत. यानुसार इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना द्यायच्या शिष्यवृत्तीचे प्रमाण केंद्र हिस्सा साठ टक्के आणि राज्य हिस्सा चाळीस टक्के, असे असणार आहे. याबाबतचा शासन निर्णय २३ जून २०२३ रोजी जारी झाला आहे. त्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत कार्योत्तर मंजुरी देण्यात आली.

### भिक्षागृहातील आता ४० रुपये मेहनताना मिळणार

भीक मागण्याचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या भिक्षागृहातील व्यक्तिचे पुनवर्सन करण्याच्या उद्देशाने त्याने केलेल्या कामासाठी दररोज चाळीस रुपये मेहनताना देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

आतापर्यंत १९६४ पासून दरमहा पाच रुपये मेहनताना दिला जात असे. भीक मागण्याची वृत्ती कमी व्हावी या उद्देशाने राज्यात महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध कायदा १९६४ पासून अस्तित्वात आहे. त्या अंतर्गत राज्यात भीक मागणाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी १४ भिक्षेकरी गृह सुरु आहेत. या भिक्षेकरी गृहात ४ हजार १२७ इतक्या व्यक्तिंचे पुनर्वसन करण्यात येते. या संस्थेत दाखल झालेल्या व्यक्तिला भिक्षागृहातून बाहेर पडल्यानंतर स्वतःचा उदरनिर्वाह करता यावा याकरिता शेती तसेच लघु उद्योगांचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते. असे प्रशिक्षण घेणाऱ्या व्यक्तिला यापुर्वी दरमहा पाच रुपये इतका मेहनताना देण्यात येत असे. हा मेहनताना आता दररोज चाळीस रुपये करण्यात येणार आहे. यातून भीक मागण्याची वृत्ती कमी होऊन, अशा व्यक्तिंना कामाची गोडी लावता येणार आहे. या निर्णयामुळे भिक्षेकऱ्यांना आत्मनिर्भरतेकडे नेण्यासाठी एक मोठे पाऊल ठरणार आहे.

### पायाभूत सुविधांना गती देण्यासाठी ‘महा इनविट’ची स्थापना

राज्यात रस्ते व पूल आदी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि भांडवल उभारणीसाठी ‘महा इनविट’ (Maha InvIT - Infrastructure Investment Trust) स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.या निर्णयामुळे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी संकलनास नवे व्यासपीठ उपलब्ध होणार असून खासगी व सार्वजनिक गुंतवणूकदारांना स्थिर परताव्याची संधी मिळणार आहे.

‘महा इनविट’ अंतर्गत शासन ट्रस्ट स्थापन करणार असून, त्यात प्रायोजक, गुंतवणूक व्यवस्थापक, प्रकल्प व्यवस्थापक अशी रचना असणार आहे. हा ट्रस्ट सेबीच्या नियमानुसार कार्यान्वित केला जाईल. इनविट (InvIT) ही संकल्पना १९६० मध्ये अमेरिकेमध्ये अंमलात आणली गेली होती. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण –एनएचएआयने २०२० मध्ये नॅशनल हायवे इन्फ्रा ट्रस्ट स्थापन करून निधी उभारला होता. त्याच धर्तीवर महाराष्ट्र अशी संस्था स्थापन करणारे पहिलेच राज्य ठरले आहे.

महा इनविटद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि महाराष्ट्र पायाभूत सुविधा महामंडळ यांच्या निवडक मालमत्ता या ट्रस्टमध्ये हस्तांतरित केल्या जातील. यामुळे भविष्यातील महसूली उत्पन्न एकरकमी स्वरुपात ट्रस्टला मिळेल आणि त्यातून नवीन प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध होणार आहे.


राज्य सरकारने महा इनविटसाठी ‘स्पेशल पर्पज व्हेईकल’ (SPV) स्थापन करण्यालाही तत्वतः मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे राज्यात दीर्घकालीन गुंतवणूक आकर्षित होणार असून, पायाभूत सुविधा क्षेत्रात तरलता वाढेल, उच्च व्याजदराच्या कर्जावरचा अवलंब कमी होईल आणि रस्ते प्रकल्पांच्या गुणवत्तेमध्ये लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धेत
# थिराणी विद्यामंदिर शाळेचा प्रथम क्रमांक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाचे वतीने राज्यात " मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा" स्पर्धेत आयोजन करण्यात आले होते. त्या अनुशंगाने ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व मान्यता प्राप्त शाळांमध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा -2 राबविण्यात आले. त्यामध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील यू.आर.सी 2 मधून ठाण्यातील श्रीमती सावित्रीदेवी थिराणी विद्यामंदिरास रुपये तीन लाखाचे प्रथम पारितोषिक प्राप्त झाले आहे. या शाळेची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. या मधून तीन शाळांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये थिराणी विद्यामंदिर प्रथम क्रमांकांची मानकरी ठरली आहे. या यशामध्ये वर्तकनगर शिक्षण मंडळ, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतरांचे सांघिक योगदान आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल वर्तकनगर शिक्षण मंडळाने मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका आणि सर्व शिक्षक शिक्षकेतरांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# माहिती उपसंचालक रवी गीते यांचा निरोप समारंभ संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोकण विभागाचे माहिती उपसंचालक रवी गीते हे नियतवयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाले. त्यांच्या चार दशकांच्या पत्रकारिता आणि शासकीय सेवेतील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी कोकण भवन, नवी मुंबई येथे एका छोटेखानी कार्यक्रमात निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला, ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, रायगडच्या जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, सहायक संचालक संजिवनी जाधव-पाटील, उपसंपादक प्रविण डोंगरदिवे, तसेच कोकण विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी आणि पत्रकार मित्र उपस्थित होते.

पत्रकारितेपासून शासकीय सेवेतले यशस्वी पाऊल

रवी गीते यांचा कारकीर्दीचा प्रारंभ नामवंत वृत्तपत्रांमधून झाला. ‘लोकपत्र’, ‘नवराष्ट्र’ आणि ‘सामना’ या प्रमुख दैनिकांत त्यांनी पत्रकार म्हणून कार्य केले. सामाजिक भान, भाषेवर प्रभुत्व आणि सजग दृष्टीकोन यामुळे त्यांची पत्रकारिता वाचकप्रिय ठरली. याच अनुभवाचा उपयोग त्यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागात सेवा बजावताना केला.

शासकीय सेवेत त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात सहायक संचालक या पदावरून प्रारंभ केला. त्यानंतर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये जिल्हा माहिती अधिकारी म्हणून काम करत असताना त्यांनी प्रशासन व प्रसारमाध्यमांमध्ये समन्वयाचा उत्तम आदर्श निर्माण केला. प्रामाणिक, मनापासूनची सेवा आणि जनसंपर्क कौशल्य हे श्री. गीते यांच्या कार्यशैलीचे विशेष पैलू होते.या कार्यक्रमात त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीचे, मृदू वर्तनाचे आणि नेहमी मार्गदर्शक म्हणून दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. उपस्थितांनी श्री. गीते हे ‘आरोग्याबाबत जागरूक’ 'तत्काळ निर्णय क्षमता' असणारे शासकीय अधिकारी अशी विविध विशेषणे देत मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी रवी गीते यांनी आपल्या भावनिक भाषणात सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आणि आपल्या कार्यकाळातील आठवणींना उजाळा देत अनुभव सांगितले की, “पत्रकारिता आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रांत मला समाजाशी थेट संपर्क साधण्याची संधी मिळाली. माहिती व जनसंपर्क विभागाने मला भरभरून दिले. या विभागात मला उत्तम मित्र भेटले तीच माझी खरी संपत्ती आहे.”

## मुरबाडमधील तुळजाभवानी शक्तीपीठाच्या
# वर्धापन सोहळ्याला एकनाथ शिंदेंची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील कळंभे येथे शिवसेना उत्तर भारतीय ठाणे जिल्हा अध्यक्ष आणि शिवसेना नेते शशी यादव यांच्या मुलाचा लग्न आणि आई तुळजा भवानी शक्ती पीठ मंदिर कळंभे मुरबाड ठाणे येथील लग्न आणि मंदिराचा वर्धापन दिन सोहळयाचे औचित्य म्हणून दर्शन आणि वर वधू ला आशीर्वाद देण्यासाठी .२९ एप्रिल २०२५रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेलीकाप्टरने शुभेच्छा देण्या साठी आले असताना त्याना देवीचा प्रसाद आणि शाल श्रीफळ पुष्प गुच्छ देऊन स्वागत सत्कार करताना शशी यादव सोबत मुलगा विशाल सून मोनिका आणि उमादेवी यादव ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, माजी नगरसेवक मुरबाडचे सुपुत्र एकनाथ भोईर, दशरथ यादव, विभागातील सन्मानीय मान्यवर आणि ग्रामस्थ तसेच परिसरातील सर्व सदस्य मोठ्या संख्येने सहभागी आणि उपस्थित होते.



## महात्मा बसवेश्वर व संत तुकडोजी महाराज समतेचे प्रणेते
### – मनिषा वाळेकर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : महात्मा बसवेश्वर हे या देशातील बाराव्या शतकात जाती प्रथा लिंग, भाषा, अंधश्रद्धा यांच्या चौकटी मोडून समानतेची मूल्यं रुजवणारे समानतेचे प्रणेते आहेत. संत तुकडोजी महाराजांनीही ग्रामगीतेतून समाजाला आदर्श मूल्य दिली. अध्यात्मातुन समाजसुधारणा करणारे तत्वज्ञ बसवेश्वर व संत तुकडोजी महाराज हे विशिष्ट जातीचे उद्धारक नसुन अखिल मानव जातीचे दिपस्तंभ आहेत. असे गौरवोद्गार अंबरनाथ नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्ष मनिषा वाळेकर यांनी या महामानवांच्या जयंतीनिमित्त काढले. अंबरनाथ नगर परिषदेच्या वतीने आयोजित संत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती उत्सवात त्या बोलत होत्या.

शिवा संघटनेचे अध्यक्ष मनोहर धोंडे यांनी शासनाकडे आग्रह धरून महात्मा बसवेश्वरांची शासकीय जयंती सुरू केली. महात्मा बसवेश्वरानंतर महात्मा ही उपाधी ज्योतिबा फुले, व महात्मा गांधी या तीनच विभूतींना लाभलीय. महात्मा बसवेश्वरांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा पुतळा लंडनमध्ये देखील उभारण्यात आला ही भारताच्या साठी भुषणावह बाब असल्याचे मनिषा वाळेकर यांनी महापुरुषांना अभिवादन करतांना सांगितले. यावेळी, अंबरनाथ नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी.उमेश राऊत , उद्योजक भूषण वाळेकर, वीरशैव लिंगायत समाजाचे संतोष जंगम तसेच नगरपरिषदेचे विविध विभागातील अधिकारी,कर्मचारी व वीरशैव लिंगायत समाजाचे बांधव उपस्थित होते.

# महाराष्ट्र वक्फ बोर्डाच्या समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करणार
### - उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राज्यात विविध इमारतींची कामे सुरु असून ही कामे पुढील पन्नास वर्षांचा विचार करुन दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच वक्फ मंडळासमोरील समस्या सोडवण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

राज्य वक्फ मंडळाशी संबंधित विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयातील उपमुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन (दूरदृश्य प्रणालीद्वारे), छत्रपती संभाजीनगर येथील वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी, मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद तसेच विभागाचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्यातील मुस्लिम बांधवांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य सेवा व इतर आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाच्या गरजा लक्षात घेऊन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. समाजातील युवकांना रोजगाराभिमुख शिक्षण व प्रशिक्षण मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन ("B"Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2025-2026
B.COM. BACHELOR OF COMMERCE
M.COM. MASTER OF COMMERCE
ADVANCED ACCOUNTANCY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

# पडघ्यात शिवजयंती उत्साहात साजरी





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

तिथीनुसार सार्वजनिक शिंवजयती उत्सव मंडळ पडघे यांच्या वतीने जिल्हा परिषद मराठी शाळा येथे शिवजयंती उत्सव घेण्यात आला यावेळी सकाळी शिवप्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली तर अक्षय तृतीयेच्या पुर्वसंध्येला संत तुकाराम महाराज मंदीर ते संपुर्ण पडघे गावातुन वाजत गाजत सजविलेल्या रथातुन शिवप्रतिमेची व वेशभूषा केलेल्या घोड्यावर स्वार झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज मावळे यांची मिरवणुक काढण्यात आली होती त्याची सुरुवात सरपंच रविंद्र विशे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवुन करण्यात आली तर मिरवणूकीत पारंपारिक वेशभूषेत सामील झालेल्या शिवतांडव ढोलताशा पथक शहापुर यांनी सर्वाचेंच लक्ष वेधुन घेतले होते. यावेळी नागरीकांनी घरासमोर सुबक रांगोळया काढल्या होत्या तर चौका चौकात अल्पोपाहार शितपेयांची व्यवस्था करण्यात आली होती शिंवजयती यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक शिंवजयती मंडळाचे अध्यक्ष पवन आरज उपाध्यक्ष विशाल तांबोळी, देवांग मुंराजन, खजिनदार संतोष अंनत तेलवणे, सहखजिनदार संतोष पंढरीनाथ तेलवणे सचीव आंनद गुप्ता सदस्य सल्लागार यांनी मेहनत घेतली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन ("B"Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2025-2026
B.A.F. ACCOUNT & FINANCE
B.M.S. BACHELOR OF MANAGEMENT STUDIES
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024